# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel : (0253) 2539292, Fax : (0253) 2539295
Website : www.muhsnashik.com, E-mail : registrar@muhsnashik.com

**डॉ. आदिनाथ सूर्यकर** — **Dr. Adinath Suryakar**
पीएच्.डी., एफएसीबीआय — Ph.D., FACBI
**कुलसचिव** — **Registrar**


जा. क्र. मआविवि/ई.३/१८/पदवी/९०४     <u>महत्वाचे/तातडीचे</u>     दि.१२/०३/२०१३

प्रति,
प्राचार्य / अधिष्ठाता,
सर्व संलग्नित आयुर्वेद महाविद्यालये,
मआविवि, नाशिक.

विषय : सुधारित तृतीय वर्ष बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम लागू करणेबाबत...

संदर्भ : १) भा.चि.के.प. यांचे पत्र क्र.२८-१३/०९-आयु सिलॅबस दि.१६/१२/२००९,
२) दि.१९/०५/२०१० रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४२५/२०१०,
३) विद्यापीठाचे पत्र क्र. मआविवि/ई.३/१८/पदवी/२४४४, दि.०२/०८/२०१०,
४) विद्यापीठाचे पत्र क्र. मआविवि/ई.३/१८/पदवी/५२७०, दि.२०/१२/२०११.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाने दि.१९/०५/२०१० रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४२५/२०१० च्या अनुषंगाने आपणास यापूर्वी विद्यापीठ पत्र क्र.मआविवि/ई.३/१८/पदवी/२४४४ दि.०२/०८/२०१० अन्वये सुधारित बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम शै. व. २०१०-११ पासुन प्रवेशित तुकडीपासुन लागू केल्याबाबत प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये व व्दितीय वर्षाचा अभ्यासक्रम संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये आपणास कळविलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेशित विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये तृतीय वर्षात प्रवेशीत होत असल्याने त्यांना तृतीय वर्षाचा बीएएमएस अभ्यासक्रम लागु करणे आवश्यक होते. यास्तव, विद्यापरिषदेच्या उपरोक्त ठरावानुसार तृतीय वर्षाचा बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम खाली नमूद केल्याप्रमाणे लागू करण्यात येत आहे. (सदर तृतीय वर्षाचा अभ्यासक्रमाची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.)

सदरचा तृतीय वर्षाचा बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१०-११ अंतर्गत प्रथम बी.ए.एम.एस. वर्षात प्रवेश घेऊन विद्यापीठाची मे/जून २०१३ मध्ये द्वितीय बी.ए.एम.एस परिक्षा उत्तीर्ण करतील व शै. व. २०१३-१४ मध्ये तृतीय वर्ष बी.ए.एम.एस. वर्षात प्रवेश घेतील अशा विद्यार्थ्यांना उक्त विद्यार्थी तुकडीपासुन लागु राहील याची नोंद घ्यावी.

*(कृ.मा.प.)*

सदर बाबत महाविद्यालय स्तरावर त्वरीत यथायोग्य कार्यवाही करण्यात यावी व सर्व संबंधितांना उपरोक्त बाब अवगत करण्यास्तव सदर पत्रास सुचनाफलकावर प्रसिध्दी देण्यात यावी.

स्वा/-
कुलसचिव

**Syllabus Subjectwise (3rd Year)**